# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**परिपत्रक क्र. आस्था/आरओ/-09-/२०२६**

या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागात कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे या संस्थेमार्फत कार्यरत कुशल / अकुशल कंत्राटी कामगारांना कळविण्यात येते की, सदर संस्थेस त्यांच्यामार्फत कार्यरत कंत्राटी कामगारांचे करार कालावधी मे-२०२५ ते मार्च-२०२६ या अकरा महिन्याचे दरमहा वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधीची रक्कम, ई.एस.आय.सी, पी.टी., जी.एस.टी. इ. रक्कम कंत्राटदार यांना अदा करण्यात आलेली आहे.

कंत्राटदार यांना सर्व कंत्राटी कामगारांना मागील महिन्याचे पगार पत्रक देणे बंधनकारक आहे. सर्व कंत्राटी कामगारांनी कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे यांच्या विद्यापीठात नियुक्त केलेले प्रतिनिधी यांच्याकडून मे-२०२५ ते मार्च-२०२६ या कालावधीचे पगार पत्रक घेवून वेतन, पी.एफ., ई.एस.आय.सी. इ. ची त्यांच्यास्तरावर पडताळणी करावी. सदर बाबीत काही आक्षेप/तक्रार असल्यास लेखी तक्रार खालील तक्त्यात महिनानिहाय कंत्राटदार यांचे प्रतिनिधी यांच्याकडे दि. ३०-०४-२०२६ पर्यंत सादर करावी.

कंत्राटदार / कंत्राटदार यांचे प्रतिनिधी यांनी सदर तक्रारींचे तक्रार प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत त्यांच्यास्तरावर शहानिशा करुन कामगारांच्या समस्यांचे निराकरण करावे.

| अ. क्र. | महिना | मिळालेले वेतन | वेतनात फरक असल्यास रक्कम नमूद करावी | पी.एफ | पीएफच्या रक्कमेत फरक असल्यास रक्कम नमूद करावी | ई.एस. आय.सी. | ईएसआयसीच्या रक्कमेत फरक असल्यास रक्कम नमूद करावी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मे-२०२५ | | | | | | |
| ०२ | जून-२०२५ | | | | | | |
| ०३ | जुलै-२०२५ | | | | | | |
| ०४ | ऑगस्ट-२०२५ | | | | | | |
| ०५ | सप्टेंबर-२०२५ | | | | | | |
| ०६ | ऑक्टोबर-२०२५ | | | | | | |
| ०७ | नोव्हेंबर २०२५ | | | | | | |
| ०८ | डिसेंबर-२०२५ | | | | | | |
| ०९ | जानेवारी-२०२६ | | | | | | |
| १० | फेब्रुवारी-२०२६ | | | | | | |
| ११ | मार्च-२०२६ | | | | | | |

तसेच या पुढे कंत्राटदार संस्थेमार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कामगारांनी दर महिन्याचे पगार पत्रक प्राप्त झाल्यानंतर मासिक वेतन, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, ई.एस.आय.सी. किंवा इतर वेतनविषयक बाबत काही आक्षेप / तक्रार असल्यास त्या-त्या महिन्यात सात दिवसांच्या आत कंत्राटदार यांच्याकडे लेखी तक्रार सादर करावी. लेखी तक्रार प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदार यांनी सदर तक्रारींचे त्याच महिन्यात निराकरणे करावे. कोणत्याही कंत्राटी कामगाराने वेळेवर लेखी आक्षेप सादर केले नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार आणि संबंधित कामगार यांची राहील विद्यापीठ प्रशासन या बाबीसाठी जबाबदार असणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्व शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रक विभागातील मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे या संस्थेमार्फत कार्यरत सर्व कंत्राटी कामगारांच्या निदर्शनास आणून द्यावे.

विद्यापीठ प्रांगण, )(
छत्रपती संभाजीनगर- ४३१ ००४ )(
संदर्भ :- आस्था/आरओ/२०२६/-09- )(
दिनांक :- २२-०४-२०२६ )(

कुलसचिव

**या परिपत्रकाची प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-**

१) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उपपरिसर, धाराशिव.

२) प्राचार्य, मॉडेल कॉलेज घनसावंगी, जि. जालना.

३) संचालक, युनिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांना देऊन विनंती करण्यात येते की, सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात यावे.

४) कंत्राटदार मे. आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित, धुळे.

*****